# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 14/07/2020 (मंगळवार)

(सकाळ)

---

### बैल चोरी

पो.स्टे. खापा :– अंतर्गत 25 कि. मी अंतरावर मौजा टेकाडी शिवार येथे दिनांक 12/07/2020 चे 18.00 वा. ते दिनांक 13/07/2020 चे 07.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– वामन डुंमनजी जोगी, वय 60 वर्ष, रा. मोगरा मेंहदी ता. सौसर जि. छिंदवाडा यांचे शेतातील मकानाचे समोरील दाराचा अज्ञात आरोपीने कुलुप तोडुन घराचे रूम मध्ये प्रवेश करून बांधुन ठेवलेले 3 बैल आणि 1 गाय असे एकुण किमती 70,000/–.रू. चा चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ दिपक मानवटकर हे करीत आहे.

### चोरी

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 10 कि. मी अंतरावर मौजा बोन्द्री येथे दिनांक 13/07/2020 चे 09.00 वा. ते 13.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– पंकज रमेश बदन, वय 26 वर्षे रा. बोन्द्री व त्याचे आई वडील कामावर गेले होते. दरम्यान फिर्यादी हे जेवन करणे करीता घरी आले असता त्यांची घराची खिडकी उघडी दिसली फिर्यादी दाराचे लॉक उघडुन आत गेले असता घरातील आलमारी उघडली तर तेथील लॉकर उघडा दिसला त्यामध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने एकुण कि. 23,568/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. रामटेक येथे आरोपीविरुध्द कलम 454, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा रामेश्वर राउत पो. स्टे. रामटेक 9420409454 हे करीत आहे.

### फसवणुक

पो.स्टे. उमरेड :– अंतर्गत 0.5 कि मी अंतरावरील मौजा स्टेट बॅक ऑफ इंडीया उमरेड शाखा एटीएम येथे दिनांक 02/07/2020 चे 12.00 वा. पर्यंत फिर्यादी नामे–किसन सोमा देशमुख, वय 61 वर्ष, रा. बोटेझरी चिचाडा, भिवापुर यांचे स्टेट बॅक ऑफ इंडीया उमरेड शाखा येथे खाते आहे. फिर्यादी हे पैसे काढण्याकरिता गेले असता त्यांचे कार्ड मशीन मध्ये फसल्याने मागे उभ्या असलेल्या अज्ञात आरोपीने फिर्यादींचा एटीएम मशीन मध्ये फसलेला ए.टी.एम कार्ड काढला व त्यांचे ए.टी.एम हातचालाखीने बदलवून त्यांच्या हातात दिले. यानंतर आरोपीने फिर्यादीच्या खात्यातून 10,000/– रु व नंतर 2,000/–रू. असे एकूण 12,000/– रु ए.टी.एम द्वारे काढून घेतले व फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी विरुध्द कलम 420 भादंवि. अन्वये अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार सुनिल हटवार 9823115373 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर